## एकमुखी दत्तमूर्ती



## ॥ॐ नमो बाळानंदाय ॥



साधारण २५० वर्षांपूर्वी श्री बाळानंदाच्या श्रीक्षेत्र माहूर् येथे ५ वर्षाच्या अखंड तपश्चर्येनंतर श्री दत्तप्रभुंनी श्री बाळानंद स्वामी यांना सगुण रूपात दर्शन देऊन स्वतःचे रूप छोट्या दत्तमूर्तीच्या स्वरूपात प्रसाद म्हणून अर्पण करून प्रतिवर्षी श्री दत्तजयंतीस ही मूती घेऊन श्रीक्षेत्र माहूर् येथे येणेची आज्ञा केली. ही विलोभनीय दत्तमूर्ती ४ ते ७ इंच उंच व बहुमूल्य धातूची एकमुखी व ६ हात असलेली आहे. तेव्हापासून आज पर्यंत प्रतिवर्षी ही एकमुखी दत्तमूर्ती घेऊन श्री दत्तजयंतीस श्रीक्षेत्र माहूर येथे जाणेची परंपरा अखंडपणे सुरू आहे. या कालावधीत साधारण ४ ते ७ पिढ्यांचा कार्यकाल व्यतित झालेला आहे. भगवंताच्या कृपेमुळेच ही परंपरा आजपर्यंत अखंडपणे सुरू आहे. यातच या मूर्तीचे सत्त्व आणि देवत्त्व तसेच श्री बाळानंदाचे साधुत्व सिद्ध होते.






आजही श्रीक्षेत्र दुसखेड येथे समर्थ बाळानंदाची समाधी व त्यांना मिळालेली प्रासादिक दत्तमूर्ती आपणास बघावयास मिळेल. समर्थांची समाधी गावाजवळच बहुला नदीचे पात्रात पुर्वाभिमुख आहे व श्री दत्तमूर्तीचे मंदिर गावात आहे.

ही दोन्ही स्थाने जागृत देवस्थाने आहेत.







तसेच श्री बाळानंदाच्या तपश्चर्येची जागा दत्तशिखर, श्रीक्षेत्र माहूर् येथे आहे. आपण आजही ती जागा बघू शकतो.






समर्थ बाळानंदस्वामींची तपश्चर्या अवस्था, बाळानंदांची समाधी, स्वामींच्या पादुका व प्रासादिक दत्तमूर्ती इत्यादींचे वेगवेगळ्या आकारातील विलोभनीय फोटो उपलब्ध आहेत. तसेच श्री बाळानंदांची ३१ अध्यायी पोथी व सप्त अध्यायी पोथी अशा दोन्हीही पोथी उपलब्ध आहेत, वरील फोनवर संपर्क केल्यास कोणताही फोटो अथवा पोथी आपणास पोस्टाने अथवा कुरिअरने पाठविली जाईल.

आपल्या देनंदिन जीवनात आपणास अनेक गंभीर समस्या निर्माण होतात व आपण निराश, हतबल होतो. अशा वेळेस आपण श्रद्धा ठेवून श्री समर्थ बाळानंद स्वामींचा अथवा प्रासादिक दत्तमूर्तीचा फोटो एका पाटावर ठेवून आपल्या समस्येचा-अडचणीचा मोठ्याने उच्चार करावयाचा, जणू देवाला आपण आपली समस्या सांगतो आहे हे जाणवले पाहिजे. नंतर फोटोची पूजा इ. करून श्री बाळानंद स्वामींच्या कोणत्याही (लहान अथवा मोठ्या ) पोथीचे चांगल्या योगावर (शुभदिन पाहून) एक अथवा दोन पारायणे मनोभावे, तन्मयतेने आणि एकाग्र चित्ताने करा. थोड्याच अवधीत आपल्या समस्येचे-संकटाचे निश्चित निरसन होईल. अनेकांनी याचा अनुभव घेतला आहे. आपणही घेऊन बघा. यास काहीच खर्च लागत नाही, कोणावरही काहीही संकट असो त्यांना हा उपाय करावयास सांगा.





आपली इच्छा असल्यास आपण आम्हास फोन करून आपल्या तर्फे (आपल्या गोत्राचा उच्चारकरून) संकल्प करून श्री बाळानंदाच्या समाधी पादुकांवर अभिषेक करू शकतात. आम्ही आपल्या नावे संकल्प करून अभिषेकाचे श्रेय व प्रसाद आपणास पोस्टाने अथवा कुरिअरने पाठवू किंवा कोणत्याही आनंदाच्या प्रसंगी काही अन्नदान / भिक्षादान / दानधर्म श्री बाळानंदाच्या नावे-प्रती करणेची इच्छा असल्यास फोन संपर्क करावा. आम्ही आपणास योग्य ते मार्गदर्शन करू.

आम्ही दरवर्षी वर सांगितल्याप्रमाणे श्री दत्तजयंतीस श्री दत्तमूर्ती घेऊन माहूर येथे निश्चितपणे येतोच. आमचा मुक्काम माहर् येथील श्री विठ्ठल मंदिर (श्री बाळानंद मठ, श्रीक्षेत्र माहूर ) येथे असतो. आपणास श्री प्रासादिक दत्तमूर्तीचे दर्शन घ्यावयाचे असल्यास आपण श्री दत्तजयंतीस माहूर् येथे येवून मूर्तीचे दर्शन घेवून आपली मनोकामना पूर्ण करू शकतात. आपणास जर माहूर यात्रेतील आमचा मुक्काम आपल्या गावी-घरीं हवा असल्यास दिवाळीपूर्वी संपर्क करावा; या म्हणजे आमच्या प्रवासाचे नियोजन त्या पद्धतीने करता येईल.

|| शुभम् भवतू |॥| कल्याणमस्तू ॥ श्रीरस्तू ||